# सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ पुणे

शिवाजीनगर, पुणे.

**(महाराष्ट्र शासनाचे एकल तंत्रज्ञान विद्यापीठ)**

Phone (Office) : 02025507002,56 website : www.coeptech.ac.in


जा. क्र.तंविपु -विद्यापीठ/शिष्यवृत्ती/२०२५/2556 दिनांक : 22 AUG 2025

## परिपत्रक

विषय: - भारत सरकार मॅटरीकोत्तर शिष्यवृत्तीस पात्र विद्यार्थ्यांच्या पालकांच्या उत्पन्न मर्यादेत रु.२.५० लाखापर्यंत वाढ करण्यात आलेली आहे.

संदर्भ :- जा.क्र.ससं/इमाबक/भासशि/विजाभज-इमाव- विमाप्र/महाडीबीटी/2025-26/1036 दि.१४.०८.२०२५

सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठातील विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील सर्व विद्यार्थ्यांना सदर परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते कि,

- शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून विजाभज, इमाव व विमाप्र या प्रवर्गातील भारत सरकार मॅटरीकोत्तर शिष्यवृत्ती करता अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे सर्व मार्गांनी मिळणारे वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.२.५० लाख करण्यात येत आहे . सदर नियम शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून लागू राहील.
- ०१ जानेवारी, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक शुल्क ( फ्रीशिप) प्रतीपूर्ती योजनेअंतर्गत पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.८.०० लक्ष इतकी करण्यात आलेली होती. यामध्ये दि.२०.०९.२०२४ रोजीच्या शासन शुध्दीपत्रकान्वये उत्पन्नाची अट रद्द करण्यात आली असून आता त्याऐवजी नॉन क्रीमीलेयर प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच दि.१५.१०.२०२४ रोजीच्या परिपत्रकानुसार यापूवी प्रवेशित विद्यार्थ्यांना देखील शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून लागू करण्यात येत असून सदर विद्यार्थ्यांना हे आदेश लागू होण्याच्या पूवीच्या कालावधीसाठी परीक्षा शुल्क व शिक्षण शुल्क प्रतिपूती अनुज्ञेय होणार नाही.

आपला विश्वासू,

कुलसचिव
सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे

**प्रत**:-

१ सर्व विभागप्रमुख

२ सर्व विद्यार्थी आणि विद्यार्थीनी

३ मा. कुलगुरूचे स्वीय सहायक

४ संस्थेचे संकेतस्थळ